# बृहन्मुंबई महानगरपालिका

**नगर अभियंता मध्यवर्ती कार्यालय**

क्र.नअ/13318/आसेप्र दि.3.11.2026

**- सूचना पत्र IV -**

जाहिरात क्र. नअ/13213/ आसेप्र दि. 25.11.2024 अन्वये, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी व विद्युत) या संवर्गातील एकूण 380 रिक्त पदे भरण्याकरिता ऑनलाईन परीक्षा दि.02.03.2025, दि.03.03.2025, व दि.08.03.2025 रोजी महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर संपन्न झालेली आहे.

कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) संवर्गाचा निकाल दि.13.10.2026 रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर संवर्गाकरिता घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधुन पडताळणी सापेक्ष कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) संवर्गाकरिता एकुण 58 उमेदवारांची तात्पुरती सामाईक निवड यादी क्र.नअ/ 12497/ आसेप्र दि.26.10.2026 अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**उपरोक्त नमूद केल्यानुसार तात्पुरती सामाईक निवड यादीमधील एकुण-58 उमेदवारांची खालील तक्ता-अ येथे नमूद केल्याप्रमाणे सर्व मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची/ प्रमाणपत्रांची पडताळणी दि.17.11.2026 ते दि.20.11.2026 या कालावधीमध्ये खालील नमूद ठिकाणी सकाळी 11.00 ते सायंकाळी 6.00 यावेळेत करण्यात येणार आहे. यास्तव, उमेदवारांस सर्व संबंधित कागदपत्रांसह खालील नमूद ठिकाणी तक्ता-अ येथे नमूद दिनांक व वेळेस उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. उमेदवाराने खालील तक्त्यात नमुद केलेल्या वेळेस व दिनांकादिवशीच पडताळणीकरिता उपस्थित राहणे बंधनकारक आहे. पडताळणीकरिता अनुपस्थित राहणा-या उमेदवारांचे नाव निवडयादीमधून कमी करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.**

| | |
|---|---|
| **कागदपत्रे पडताळणीकरिता उपस्थित राहावयाचे ठिकाण** | **बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, जुनी इमारत, दुसरा मजला, सभागृह क्र.1, महानगरपालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- 400 001** |

| दिवस | तात्पुरत्या निवड यादीतील खालील अनु. क्र. वरील उमेदवार | उमेदवारांची संख्या | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 ते 20 | 20 | दि.17.11.2026 | सकाळी 11.00 वाजता |
| 2 | 21 ते 40 | 20 | दि.18.11.2026 | सकाळी 11.00 वाजता |
| 3 | 41 ते 58 | 20 | दि.19.11.2026 | सकाळी 11.00 वाजता |

टिप- दिव्यांग उमेदवारांना नियोजित स्थळी उपस्थित राहण्यास संबंधित दिवशी होणारा विलंब गृहित धरण्यात आलेला आहे.

सही/-
दि.०३.११.२०२६
नगर अभियंता

**बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या संवर्गातील सरळसेवा भरतीप्रक्रिया 2024-25 अंतर्गत उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी पडताळणी करावयाच्या दस्तऐवजांची तपासणी सूची**

| अ.क्र. | मूळ प्रती तसेच त्याच्या छायांकित प्रती |
|---|---|
| 1 | ऑन लाईन अर्ज, ई-मेल द्वारा प्राप्त झालेल्या प्रस्तुत पत्राची प्रत |
| 2 | सुस्पष्ट फोटो असलेले ओळखपत्र (उदा. मूळ पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना, निवडणूक ओळखपत्र, पारपत्र वा इतर ओळखपत्र |
| 3 | शाळा सोडल्याचा दाखला/ जन्म दाखला |
| 4 | अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) (दोन्ही बाजूंची छायांकित प्रत) |
| 5 | एस.एस.सी.गुणपत्रिका व उत्तीर्णचे प्रमाणपत्र.(दोन्ही बाजूंची छायांकित प्रत) |
| 6 | 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) उत्तीर्ण प्रमाणपत्र |
| 7 | एच.एस.सी. गुणपत्रिका व उत्तीर्णचे प्रमाणपत्र.(दोन्ही बाजूंची छायांकित प्रत)(लागू असल्यास) |
| 8 | पदविका परीक्षेच्या सर्व सत्र/वर्षाच्या गुणपत्रिका, उत्तीर्ण प्रमाणपत्र, विद्यापीठाचे प्रमाणपत्र व छायांकित गुणपत्रिका.(दोन्ही बाजूंची छायांकित प्रत) |
| 9 | पदविका प्राप्त विद्यापीठाकडून टक्केवारी प्रमाणपत्र (percentage conversion certificate) (ग्रेड मार्किंग असल्यास) |
| 10 | पदविका प्राप्त विद्यापीठ (MSBTE-DTE ) मान्यताप्राप्त असल्याबाबतचे विद्यापीठ प्रमुख यांच्या स्वाक्षरीचे पत्र. |
| 11 | जातीचे प्रमाणपत्र |
| 12 | जात वैधता प्रमाणपत्र |
| 13 | अजा, अज व खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घेणारे उमेदवार वगळता सर्व मागासप्रवर्गातील उमेदवारांनी सक्षम प्राधिका-यांनी दिलेले वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केलेला परिशिष्ट – 2, अर्ज व सोबत जोडण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची तहसिल कार्यालयामार्फत साक्षांकित केलेली छायांकित प्रत. |
| 12 | सरकारी नोकरीत असल्यास कार्यालय प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र. |
| 13 | विवाहीत महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र आणि राजपत्र. |
| 14 | Employment Exchange कडून प्राप्त झालेले रोजगार नोंदणी कार्ड (असल्यास) |
| 15 | खेळाडू उमेदवारांच्या बाबतीत, विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू संबंधित संवर्गासाठी पात्र ठरत असल्याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. |
| 16 | दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत, किमान 40% दिव्यांगत्वाचे शासकीय सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र. |
| 17 | अनाथ उमेदवारांच्या बाबतीत, सुधारित नमुन्यातील सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र |
| 18 | माझी सैनिक असल्यास जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र. |
| 19 | प्रकल्पग्रस्त असल्यास संबंधित जिल्हाधिकारी किंवा पूनर्वसन अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र. |
| 20 | भूकंपग्रस्त असल्यास संबंधित जिल्हाधिकारी किंवा पूनर्वसन अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र. |
| 21 | अंशकालीन उमेदवार असल्यास सदर उमेदवारांनी 'सुशिक्षित बेरोजगार' या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयात तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केले असल्याचा पुरावा व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्याचा पुरावा सादर करणे. |
| 22 | 4 पासपोर्ट साईज छायाचित्र(Photograph) |
| 23 | संबंधित अन्य प्रमाणपत्रे |

**टिप -**

| | |
|---|---|
| 1 | प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पाठविलेले हे पत्र म्हणजे नियुक्ती पत्र नाही याची कृपया नोंद घ्यावी. |
| 2 | उपरोक्त नमूद केलेल्या दस्तऐवज तपासणी सूचीच्या अनुषंगाने सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती तसेच स्वत: प्रमाणित केलेल्या छायांकित प्रतीचा संच सोबत आणावा. |
| 3 | आपल्या जन्मापासून ते आजमितीपर्यंतचे वास्तव्य केल्याचे सर्व पत्ते (कालावधीसह) तसेच, सदर कालावधीतील पोलीस स्थानक/पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि ई-मेल आयडी इत्यादी माहिती या कार्यालयात प्रमाणपत्र पडताळणी वेळेस सादर करणे आवश्यक राहिल. |
| 4 | एस.एस.सी., एच.एस.सी, पदविका, पदवी किंवा तत्सम परीक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नात उत्तीर्ण झालेले असल्यास उमेदवारांनी प्रत्येक प्रयत्नांची गुणपत्रिका व एकूण प्रयत्नांचे सर्व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. |
| 5 | दस्तऐवज पडताळणीवेळी सादर करावयाची प्रमाणपत्रे/कागदपत्रे संदर्भात अधिक विस्तृत स्वरुपातील माहितीकरीता कृपया सविस्तर जाहिरात अवलोकावी. |